11-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/10/2025 11:20 PM Page 1

दाग फोंड्यात पाण्यासाठी घागर मोर्चा

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



रवींद्र जडेजा ठरला सर्वोत्तम क्षेत्ररक्षक

पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, ११ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 188 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 11 March 2025 | Pages 4 | ₹ 4

निवडक

भूपेश बघेल यांच्या घरावर ईडीची धाड

छत्तीसगड, दि. १० : छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचे पुत्र चैतन्य बघेल यांच्याविरोधात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई केली आहे. ईडीने बघेल कुटुंबाशी संबंधित राज्यातील १४ ठिकाणांवर छापेमारी केली आहे. प्रामुख्याने ही चैतन्य बघेल यांच्याविरोधातील कारवाई असल्याचं सांगितलं जात आहे. छत्तीसगडमधील कथित मद्य घोटाळ्याशी संबंधित पुरावे गोळा करण्यासाठी ही छापेमारी करण्यात आली आहे. छत्तीसगड सरकारच्या कथित मद्य घोटाळाप्रकरणात बघेल यांनी २०१९ ते २०२२ दरम्यान राज्याच्या तिजोरीमधील २,१६१ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. ईडीने म्हटलं आहे की याप्रकरणी केलेल्या तपासादरम्यान असे काही धागेदोरे हाती लागले आहेत जे चैतन्य बघेल यांच्याशी जोडलेले आहेत. त्या पुराव्यांच्या आधारावर आज चैतन्य बघेल यांच्याशी संबंधित ठिकाणांवर छापेमारी करण्यात आली आहे.

अफगाणिस्तान भूकंपाने हादरला

काबुल, दि. १० : भारताच्या शेजारील अफगाणिस्तान सोमवारी भूकंपाच्या तीव्र धक्क्यांनी हादरला. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४ रिश्टर स्केल इतकी होती, परंतु भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीपासून फक्त १० किलोमीटर खाली होता, त्यामुळे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने सांगितले की, भूकंपाचे केंद्र हिंदुकुश प्रदेश होते. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीने म्हटले आहे की, पृष्ठभागावर होणारे भूकंप जमिनीत खोलवर होणाऱ्या भूकंपांपेक्षा जास्त धोकादायक असतात. पृष्ठभागावर होणारे भूकंप जास्त ऊर्जा सोडतात, ज्यामुळे जमिनीवरील संरचनांचे जास्त नुकसान होते. सध्या अफगाणिस्तानात भूकंपामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. याआधी पाकिस्तानमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले होते. ८ मार्च रोजी पाकिस्तानमध्ये झालेल्या भूकंपाची तीव्रता ४.२ होती आणि त्यामुळे कोणतेही नुकसान झाले नाही.

आयपीएलमध्ये तंबाखूच्या जाहिरातींवर बंदी घाला

नवी दिल्ली, दि. १० : केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ला सामन्यांच्या वेळी मैदानाच्या परिसरात तसेच सामन्यांच्या प्रसारणा दरम्यान तंबाखू, अल्कोहोलच्या जाहिरातींवर बंदी घालण्यास सांगितले आहे. यासंबंधी आरोग्य सेवा महासंचलनालयाने (डीजीएसएस) आयपीएलचे अध्यक्ष अरुण सिंग धुमल यांना पत्र लिहीले आहे. दरवर्षी तंबाखूमुळे भारतात १४ लाख मृत्यू होतात, असे पत्रात म्हटले आहे. २२ मार्चपासून सुरू होणाऱ्या आयपीएल हंगामापूर्वी सरकारने हा पत्र व्यवहार केला आहे. या पत्रात 'डीजीएचएस'चे प्रमुख अतुल गोयल यांनी भारतातील हृदयरोग, कर्करोग, दीर्घकालीन फुफ्फुसांचे आजार, मधुमेह आणि उच्च रक्तदाब यासारख्या असंसर्गजन्य आजारांच्या (एनसीडी) वाढत्या धोक्याबद्दल चिंता व्यक्त केली. त्यांनी निदर्शनास आणून दिले की देशातील वार्षिक मृत्यूच्या आकडेवारीपैकी ७० टक्क्यांहून अधिक मृत्यूंसाठी तंबाखू आणि अल्कोहोल हे जबाबदार प्रमुख घटक आहेत. केंद्राने पत्रात म्हटले की, दरवर्षी जवळजवळ १४ लाख मृत्यूंसाठी तंबाखूचा जबाबदार आहे. ज्यामुळे भारत जागतिक स्तरावर

हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६)

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

बेकायदेशीर दगडखाणींविरोधातील आंदोलन अधिक तीव्र होणार

■ टीम दैनिक हेराल्ड :

दोडामार्ग, दि. १० : तिलारी धरणाजवळ सुरू असलेल्या बेकायदेशीर खाणकामाविरोधात खानयाळे ग्रामस्थांनी सुरू केलेले साखळी उपोषण पाच दिवसांनंतरही सुरूच आहे. या आंदोलनात महिलांनी सक्रीय सहभाग घेतला असून, गावातील ब्लास्टिंग व दगड उत्खनन तातडीने थांबवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तिलारी कालव्याच्या परिसरात सुरू असलेल्या अनेक खाणींमुळे पर्यावरण व स्थानिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

शिंदे शिवसेनेचे सावंतवाडीचे आमदार दीपक केसरकर यांनी सोमवारी आंदोलकांची भेट घेतली आणि परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी जिल्हाधिकारी, स्थानिक सरकारी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या संयुक्त समितीची स्थापना करण्याचे निर्देश दिले. या समितीमार्फत खाणींचे सर्वेक्षण करून संपूर्ण अहवाल सादर केला जाणार आहे. आंदोलकांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, जोपर्यंत सरकार खाणी कायमस्वरूपी बंद करण्याचा लेखी आदेश देत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील.

खानयाळे येथील रहिवासी नागराज नाईक म्हणाले की, आमदार केसरकर यांनी खाणींची तपासणी करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, आम्हाला केवळ समिती नव्हे, तर खाणी कायमस्वरूपी बंद होणार, याची लेखी हमी हवी. तोपर्यंत आमचे साखळी उपोषण सुरूच राहील.

ग्रामस्थांनी गोवा सरकारलाही याबाबत सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. विनिता गावडे यांनी सांगितले की, तिलारी धरणाचे पाणी गोव्यात पुरवले जाते. मात्र, महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे कालवा फुटण्याचा धोका आहे. जर पावसाळ्यात पाणी साचले आणि ओव्हरफ्लो झाले, तर गोव्याला महापूर येऊ शकतो.

दगड वाहतूक करणाऱ्या ट्रकांमुळे स्थानिक वाहतुकीवरही परिणाम होत आहे. गावडे पुढे म्हणाल्या, मुख्य रस्त्यावरून जाणाऱ्या ट्रकांमुळे शाळकरी मुलांचे जीवन धोक्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला.

आरोग्य धोक्यांबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. खाणींमधून उठणाऱ्या धुळीमुळे गावकऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. घरी देखील धूळ मोठ्या प्रमाणावर जमा होत असून, श्वसनासंबंधी आजार वाढले आहेत. प्रशासनाने आजवर या समस्येकडे दुर्लक्ष केले आहे

खाणींच्या प्रश्नावर ग्रामस्थ आक्रमक होत असून, सरकारने तातडीने लेखी आदेश द्यावेत, अशी मागणी केली जात आहे. प्रशासनाने योग्य निर्णय न घेतल्यास हे आंदोलन आणखी तीव्र होईल, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

'आप'चा स्वबळाचा निर्धार, युतीला स्पष्ट नकार

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १० : २०२७ च्या गोवा विधानसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षाशी युती न करता आम आदमी पक्ष स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याची घोषणा पक्षाच्या वरिष्ठ नेत्या आणि दिल्लीच्या विरोधी पक्षनेत्या आतिशी यांनी सोमवारी गोव्यात केली.

गोव्यातील जिल्हा परिषद आणि नगरपालिका निवडणुकांसह सर्व निवडणुका स्वबळावर लढवण्याचा निर्णय पक्षाने घेतला असून, राज्याच्या राजकारणात आपचा स्वतंत्र ठसा उमटवण्याचा निर्धार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आम्ही जिल्हा परिषद आणि नगरपालिका निवडणुका देखील स्वबळावर लढवणार आहोत. विधानसभा निवडणुकीसाठीही 'आप' स्वतंत्रपणे मैदानात उतरणार आहे, असे आतिशी यांनी सोमवारी कोलवा येथे 'हेराल्ड मीडिया'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितले.

काँग्रेससोबत निवडणूकपूर्व युतीच्या शक्यतेबाबत विचारले असता, आतिशी यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. गेल्या निवडणुकीत काँग्रेसने ११ जागा जिंकल्या, पण त्यातील ८ आमदार भाजपमध्ये सामील झाले. अशा पक्षावर आपण कसा विश्वास ठेवू शकतो? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

त्या पुढे म्हणाल्या, लोक समान विचारसरणीच्या पक्षांच्या युतीबद्दल बोलत असतात. पण, काँग्रेसच्या ८० टक्के आमदारांनी राजीनामा दिला आहे आणि हे दुसऱ्यांदा घडत आहे. अशा परिस्थितीत काँग्रेससोबत युती करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

गोव्यातील स्थानिक आप नेत्यांमध्ये काँग्रेससोबत युतीबाबत चर्चा झाल्याच्या वृत्ताला उत्तर देताना आतिशी म्हणाल्या की, 'आप' संपूर्ण स्वबळावर लढेल. भविष्यात गोवा हे आमच्या पक्षासाठी प्राधान्य राज्य असेल आणि आम्ही येथे पक्ष वाढवण्यावर लक्ष केंद्रित करू. 'आप'च्या या भूमिकेमुळे २०२७ च्या विधानसभा निवडणुकीत गोव्यात राजकीय समीकरणे कशी बदलतील, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

अर्थसंकल्पीय आढावा बैठकीत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यावर भर

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १० : मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सोमवारी २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय वापराचा तसेच आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठीच्या कृती आराखड्याचा सखोल आढावा घेतला. या बैठकीस मुख्य सचिव डॉ. व्ही. कँडावेलो, विविध सरकारी विभागांचे सचिव, दोन्ही जिल्हाधिकारी आणि विभागप्रमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी सांगितले की, या आढावा बैठकीत केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी तसेच भारत सरकारच्या नव्या योजनांचा राज्यात प्रभावीपणे राबविण्याच्या दिशेने चर्चा झाली. याशिवाय, आगामी २०२५-२६ च्या राज्य अर्थसंकल्पाची तयारी, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयांमधील प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा यावर भर देण्यात आला. यावेळी, विविध शासकीय सेवांचे डिजिटायझेशन करण्यासंदर्भातही आढावा घेण्यात आला. नव्याने ऑनलाईन सेवा सुरू करणे, तसेच सध्याच्या सेवांचे आधुनिकीकरण करणे यावर विशेष चर्चा झाली. मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी अधिकाऱ्यांना दयानंद सामाजिक सुरक्षा योजना, लाडली लक्ष्मी योजना, गृहआधार, कलाकार समर्थन योजना आणि अन्य सामाजिक कल्याणकारी योजनांच्या थकबाकीच्या तत्काळ निकाली निघण्याच्या दृष्टीने आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश दिले. तसेच, पेमेंट प्रक्रियेत पारदर्शकता वाढवण्यासाठी आधार-आधारित पेमेंट प्रणालीची अंमलबजावणी गतीने करण्याचे आदेश दिले.

राज्य विकासाच्या दृष्टीने या बैठकीत ज्या मुख्य मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. त्यात पर्यावरणपूरक उपक्रमांवर भर देणारे ग्रीन बजेट, घनकचरा व्यवस्थापन टिकाऊ उपाययोजना पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, नागरिकांसाठी सुलभ व जलद ऑनलाईन सेवा यांचा समावेश होता.

मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी सांगितले की, नागरिकांकडून प्राप्त सूचना आणि प्रस्तावांचा विचार करून आगामी अर्थसंकल्प तयार केला जाईल. राज्याच्या दीर्घकालीन विकासाला गती देण्यासाठी आणि प्रशासन अधिक कार्यक्षम करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असेही त्यांनी नमूद केले.

मटण दुकानांसाठी मंत्री राणेंची नवी घोषणा

मुंबई, दि. १० : महाराष्ट्र राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी केवळ हिंदू समाजाच्या मालकीच्या मटण दुकानांसाठी 'मल्हार प्रमाणपत्र' जाहीर केले आहे. या उपक्रमाची घोषणा करताना त्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की,मल्हार प्रमाणपत्र नसलेल्या ठिकाणांहून मटण खरेदी करू नये. या उपक्रमाच्या माध्यमातून हिंदू तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा उद्देश असल्याचे मंत्री राणे यांनी स्पष्ट केले. तसेच, या प्रमाणपत्रामुळे मटणामध्ये कोणतीही भेसळ होणार नाही, असेही ते म्हणाले. 'मल्हार प्रमाणपत्र' हे हलाल प्रमाणपत्रासारखेच असणार आहे. सध्या भारतात हलाल प्रमाणन अंतर्गत इस्लामिक कायद्यांनुसार प्राण्यांची कत्तल केली जाते, तर मल्हार' प्रमाणपत्र अंतर्गत झटका पद्धतीने प्रक्रिया केली जाणार आहे.

कुख्यात ललित मोदी यांचे वानुआटू सरकारकडून नागरिकत्व रद्द

नवी दिल्ली, दि. १० : कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याच्या आरोपांमुळे चौकशी सुरू असलेले आणि भारतीय अंमलबजावणी संस्थांना वॉन्टेड असलेले ललित मोदी यांनी सोमवारी सोशल मीडियावर वानुआटू देशातील छायाचित्रे शेअर करत या बेट राष्ट्राच्या सौंदर्याचे वर्णन केले आहे. ललित मोदी यांच्या एक्सवरील पोस्टनंतर लगेचच वानुआटूच्या पंतप्रधान जोथम नापट यांनी नागरिकत्व आयोगाला मोदींचा पासपोर्ट तातडीने रद्द करण्याचे निर्देश दिले आहेत. इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)चे माजी आयुक्त ललित मोदी यांनी भ्रष्टाचार करून २०१० मध्ये भारत सोडून लंडनमध्ये वास्तव्य स्वीकारले आहे.

७ मार्च रोजी ललित मोदींनी लंडनमधील भारतीय उच्चायुक्तालयात आपला भारतीय पासपोर्ट परत करण्यासाठी अर्ज सादर केला. दक्षिण प्रशांत महासागरातील वानुआटू या राष्ट्राचे नागरिकत्व त्यांनी स्वीकारल्याचे स्पष्ट झाले आहे. तथापि, आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये झालेल्या चर्चेनंतर वानुआटू सरकारने ललित मोदींचे नागरिकत्व रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

वानुआटू सरकारच्या अधिकृत निवेदनानुसार, इंटरपोलच्या पार्श्वभूमी तपासणीदरम्यान ललित मोदींविरोधात कोणताही गुन्हेगारी आरोप आढळलेला नव्हता. मात्र, गेल्या २४ तासांतील माहितीनुसार, भारतीय अधिकाऱ्यांनी मोदींविरोधात अलर्ट नोटीस जारी करण्याची विनंती इंटरपोलने दोन वेळा फेटाळली आहे.

ललित मोदी हे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे माजी उपाध्यक्ष असून, बोली-हेराफेरी, मनी लॉंड्रिंग आणि परकीय चलन व्यवस्थापन कायदा १९९९ अंतर्गत गंभीर आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत. २०१० मध्ये आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीदरम्यान त्यांनी भारत सोडला होता.

भारतीय पासपोर्ट परत करण्याची त्यांची विनंती मान्य झाल्यास, ते युनायटेड किंगडममध्ये बेकायदेशीर परदेशी ठरू शकतात. त्यातच, वानुआटू सरकारने त्यांचे नागरिकत्वही रद्द केल्याने त्यांच्या भविष्यातील नागरिकत्वाच्या पर्यायांबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

ग्रीन क्रेडिट्स पद्धतीविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल

नवी दिल्ली, दि. १० : पर्यावरण संवर्धनासाठी प्रस्तावित 'ग्रीन क्रेडिट'पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत गोव्यातील पर्यावरण गट 'रेन्बो वॉरियर्स' आणि ' पीपल फॉर अरावलीस' यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून स्पष्टीकरण मागविले आहे. याचिकाकर्त्यांनी असा आरोप केला आहे की, या नियमांमुळे नैसर्गिक परिसंस्थांवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

मार्च २०२५ मध्ये दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत, सरकारने लागू केलेल्या ग्रीन क्रेडिट नियमांचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे. या नियमानुसार कंपन्यांना झाडे लावून व्यापारयोग्य क्रेडिट्स मिळवण्याची मुभा देण्यात आली आहे, जे नंतर गैर-वनीकरण प्रयोजनांसाठी वापरले जाऊ शकतात. 'रेन्बो वॉरियर्स'ने पश्चिम घाटाच्या संवर्धनासाठी आणि वनसंवर्धन कायद्यातील सुधारणांच्या विरोधात याआधीही आक्षेप नोंदवले आहेत.

'रेन्बो वॉरियर्स' चे सरचिटणीस अभिजित प्रभुदेसाई यांनी या नियमांवर तीव्र टीका केली. हे नियम कंपन्यांना रोपांची लागवड करून श्रेय घेण्याची मुभा देतात, मात्र त्या रोपांची देखभाल आणि संवर्धन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर नाही. हा पर्यावरणीय संवर्धनाचा केवळ दिखावा असून वास्तवात नैसर्गिक परिसंस्थांचे नुकसान करणारा उपक्रम आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

याचिकेतील दाखल पुराव्यांनुसार, देशभरातील वृक्षारोपण प्रकल्पांपैकी केवळ ६% ते ३०% झाडे प्रत्यक्षात टिकतात. त्यामुळे या नियमांचा पर्यावरण संरक्षणावर फारसा परिणाम होत नाही, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. 'रेन्बो वॉरियर्स' आणि इतर पर्यावरण कार्यकर्त्यांनी याचिकेत आणखी एक गंभीर मुद्दा मांडला आहे. नैसर्गिकरित्या वृक्षविहीन भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचा परिणाम. सध्याच्या नियमांनुसार प्रति हेक्टर १,१०० झाडे लावण्याची सक्ती करण्यात आली आहे, जी खुल्या गवताळ प्रदेशांसाठी आणि इतर नैसर्गिक परिसंस्थांसाठी घातक ठरू शकते. सवाना गवताळ प्रदेशआणि अरावली पर्वतरांगा अशा संवेदनशील भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केल्यास तेथील जैवविविधतेला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

वन्यजीव जीवशास्त्रज्ञ मलायका मॅथ्यू चावला यांनी स्पष्ट केले की, भारतातील सवाना गवताळ प्रदेश ग्रेट इंडियन बस्टर्डसारख्या धोक्यात असलेल्या प्रजातींसाठी आवश्यक आहेत. या परिसंस्थांमध्ये जबरदस्तीने वृक्ष लागवड करणे म्हणजे पर्यावरणाच्या मूळ रचनेला बाधा आणणे आहे.

या याचिकेत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडण्यात आला आहे. वन हक्क कायद्याचे संभाव्य उल्लंघन. आदिवासी व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, सुमारे १.१७ लाख समुदायांचा वनहक्क कायद्यांतर्गत दावा आहे. याचिकाकर्त्यांच्या मते, ग्रीन क्रेडिट नियम अंमलात आल्यास या समुदायांच्या हक्कांवर गदा येऊ शकते. पीपल फॉर अरावलीसच्या संस्थापक नीलम अहलुवालिया यांनी यावर भाष्य करताना सांगितले की, आमची मागणी स्पष्ट आहे. कंपन्यांनी केवळ झाडे लावून जबाबदारीतून सुटू नये. त्यांना या झाडांच्या संवर्धनासाठी जबाबदार धरले पाहिजे. तसेच संवेदनशील परिसंस्थांमध्ये बळजबरीने वृक्षारोपण थांबवले जावे आणि स्थानिक समुदायांचे हक्क अबाधित राहावेत.

ग्रीन क्रेडिट नियम २०२३ मध्ये लागू करण्यात आले होते आणि २०२४ मध्ये त्यामध्ये सुधारणा

पान २ ▶

महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर; विरोधकांची टीका

▶ विकास, पायाभूत सुविधा, परकीय गुंतवणुकीवर भर

मुंबई, दि. १० : महाराष्ट्राचे अर्थमंत्री अजित पवारांनी छत्रपती शिवाजी महाराजांसह सर्वच महापुरुषांना वंदन करुन महाराष्ट्र सरकारचा यंदाचा २०२५-२६ अर्थसंकल्प वाचण्यास सुरुवात केली. अर्थसंकल्पात अजित पवारांनी महाराष्ट्राचा विकास, पायाभूत सुविधा, शासनाच्या विविध योजना, परकीय गुंतवणूक, आद्यौगिक क्षेत्रातील वाढ यांसह विविध विषयांवर भर दिला. महाराष्ट्र राज्य सरकारचा १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. प्रशासन कार्यक्षम होईल यात शंका नाही. राज्याचे नवीन औद्योगिक धोरण जाहीर होईल ५० लाख नोकऱ्यांचा उद्देश सरकारच्या समोर असेल, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

अर्थसंकल्पात मुंबई महानगर प्रदेश म्हणजेच एमएमआरडीएला आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र अर्थात ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर, विरार-बोईसर या ७ ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्र निर्माण केली जाणार आहेत. एमएमआरडीएची सध्याची अर्थव्यवस्था १४० बिलियन डॉलरची आहे. ती २०३० पर्यंत ३०० बिलियन डॉलर आणि २०४७ पर्यंत १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचा सरकारचा मानस आहे. पायाभूत विकास आणि पायाभूत सुविधांमध्ये १ रुपया गुंतवल्यास स्थूल राज्य उत्पन्नात २.५ ते ३.५ रुपयांची वाढ होते. ही बाब लक्षात घेऊन विमान चालन, रेल्वे. मेट्रो, महामार्ग, जल

पान २ ▶

विरोधकांचे आंदोलन

शेतकऱ्यांना कर्जमाफीबद्दल मात्र कोणताही दिलासा देण्यात आला नाही. तसेच लाडकी बहिणींना देखील २१०० रुपये देण्याचा कोणताही उल्लेख बजेटमध्ये करण्यात आलेला नाही. त्यामुळे विरोधक आक्रमक झाले महायुतीविरोधात विधानभवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांनी आंदोलन केले. गुलाबी जॅकेटवाले, क्या हुवा तेरा वादा? अशा प्रकारच्या घोषणा विरोधकांनी दिल्या.